Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३० • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.८ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.





# चंद्रपुरात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला आरक्षण बचाव महामोर्चा

**चंद्रपूर :- सर्व मागासवर्गीय तसेच अनुसूचित जाती-जमातीमधिल नागरिकांच्या आरक्षणाला धोका निर्माण करणाऱ्या दोन अधिसूचना महाराष्ट्र सरकारने मागे घ्याव्या. तसेच जातनिहाय जनगणना करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी चंद्रपुरातील गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ७ फेब्रुवारीला मोर्चा काढण्यात आला. अनुसुचित जाती-जमाती तसेच भटक्या विमुक्त जातीच्या विविध संघटनांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. मोर्चामध्ये जिल्ह्याभरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाच्या मार्गावर विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी पेंडाल टाकून मोर्चाचे स्वागत केले. तसेच या मोर्चाला पाठिंबा दर्शविला.**

महाराष्ट्र शासनाने २७ डिसेंबर २०२३ व २६ जानेवारी २०२४ रोजी आरक्षणाच्या संदर्भात दोन अधिसुचना काढल्या. या अधिसुचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यास जातीचे खोटे दाखले व जात वैधतेचे खोटे प्रमाणपत्र मिळणे शक्य होईल. त्यामुळे भविष्यात अनुसूचित जाती,अनुसुचित जमाती तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील मुळ व खऱ्या नागरिकांच्या आरक्षणाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्या अधिसुचना रद्द करण्यात याव्या, जातनिहाय जनगणना करण्यात यावी, यासाठी गांधी चौकातून मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हाधिकारी संयोजक सचिन राजूरकर यांनी भूमिका मांडली. यावेळी प्रमोद बोरीकर यांनी अनुसुचित जमातीचे तर नभा वाघमारे यांनी अनुसुचित जातीचे प्रतिनिधी म्हणून भूमिका मांडली. बबलू कटरे यांनी सुद्धा भूमिका विशद केली यानंतर मोर्चात सहभागी नागरिकांच्या मागणीनुसार विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार, आमदार किशोर जोरगेवार व वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी दोन्ही अधिसूचना रद्द होण्यासाठी विधानसभेत संपूर्ण ताकदीनिशी संघर्ष करण्याचा शब्द उपस्थित जनसमुदायाला दिला.जिल्हा प्रशासनातर्फे उपनिवासी जिल्हाधिकारी कुंभार यांनी



मोर्चाच्या ठिकाणी निवेदन स्वीकारले. निवेदन देताना मोर्चाच्या आयोजन समितीचे संयोजक , दिनेश चोखारे, नंदू नागरकर, मुकेश जीवतोडे,जयदीप रोडे,सतिश भिवगडे,मनीषा बोबडे, गोमती पाचभाई,डॉ.दिलिप कांबळे,प्रविण खोब्रागडे, पांडुरंग टोंगे, अनिल धानोरकर,विलास माथनकर, जितेश कुळमेथे, विजय मडावी,कृष्णा मसराम,रविंद्र टोंगे, विजय बलकी, प्रेमानंद जोगी, पांडुरंग टोंगे, सूर्यकांत खनके, प्रा.अनिल शिंदे, भोला मडावी, राजा अडकीने,अवधूत कोटेवार, अमोल घोडमारे उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन श्याम लेडे, डॉ. संजय घाटे व पप्पू देशमुख तसेच आभार ड. पुरूषोत्तम सातपुते यांनी केले.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार व अजित पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट),गोंडवाना गणतंत्र पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, यंग चांदा ब्रिगेड,आम आदमी पार्टी, भारतीय जनता पार्टी,शेतकरी संघटना, जनविकास सेना अशा विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच अनेक सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.विशेष म्हणजे मोर्चाचे नेतृत्व महिला व मुलींनी केले.



## तक्रारकर्त्यांचे बयान बदलवून खोटा अहवाल सादर

## मनरेगा भ्रष्टाचार प्रकरणात बयानदारांचा आरोप

**चिमूर । प्रतिनिधी**

जवराबोडी येथील मनरेगा कामात रोजगार सेवकाने केलेल्या भ्रष्टाचाराची तक्रार जवराबोडी ग्रामपंचायतचे सरपंच व उपसरपंच तसेच नागरिकांनी सुरुवातीला संवर्ग विकास अधिकाऱ्याकडे केली होती. त्यावेळी संवर्ग विकास अधिकारी यांनी चौकशी समिती नेमून समितीने थातूर-मातुर चौकशी करून खोटा अहवाल सादर केला. व रोजगार सेवकाला वाचवण्याचे पुरेपूर प्रयत्न केले.त्या विरोधात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार देऊन सुद्धा कारवाई न झाल्याने सरपंच उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी उच्च न्यायालय नागपूर यांचेकडे तक्रार दाखल केली.

त्यानंतर न्यायालयाने मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रपूर यांना सविस्तर चौकशी करून एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुद्धा अहवाल तयार करण्यास दिरंगाई केली. याबाबत वारंवार चौकशीचा तगादा सरपंच व उपसरपंच व




गावातील नागरिकांनी लावल्यामुळे जिल्हास्तरीय समिती नेमून चौकशी केली. असता मनरेगाच्या कामातून रोजगार सेवकाने लावलेले सात लाखांचे झाडे दिसून आले नाही. तसेच गुरांचे गोटे जुनेच दाखवून पैशाची उचल केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधितांचे लेखी बयान नोंदविल्या गेले. परंतु नागरिकांनी बयान नोंदवित असताना व्हिडिओ रेकॉर्डिंग केली असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले.परंतु अहवाल बनविताना समितीने बयाना मध्ये फेरफार करून रोजगार सेवकाच्या बाजूने आरोपीचे चुकीचे बयान नोंदवले व रोजगार सेवकास वाचविण्याच्या उद्देशाने अहवाल तयार केला. तो अहवाल आम्हाला मान्य नसून सन २०२० ,२०२१ ,२०२२ या वर्षांमध्ये झालेल्या कामाची रीतसर चौकशी करण्यात यावी, कारण कामावर दाखवलेले मजूर हे बोगस मजूर असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. यामध्ये दोन मजूर आधीच मृत असून एक मजूर सहा वर्षापासून बाहेर राज्यांमध्ये राहत आहे. वृक्ष लागवडीचे काम हे मनरेगा मार्फत झालेले नसून महिला मंडळ मार्फत झालेले आहे. त्या कामाचे रोजगार सेवकाने मनरेगा मार्फत बिले काढून सरपंच यांना कोणत्याही कामाची पूर्वकल्पना न देता व कोणत्याही मस्टरवर सही न घेता भ्रष्टाचार केला असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले. एकूणच या भ्रष्टाचार प्रकरणात रोजगार सेवक महादेव गजघाटे व इंजिनियर मेश्राम यांना वाचवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रयत्न करीत असल्याचे आरोप पत्रकार परिषदेत केला. या विरुद्ध सरपंच उपसरपंच तथा गावकरी उच्च न्यायालयात दाद मागणार अशी माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेला सरपंच वैशाली नरेश ठाकरे, उपसरपंच अमोल सावसाकडे, विजू रामकृष्ण मिरे, नारायण हिरामण राऊत, चंदू गजघाटे, कमलाकर ठाकरे, रामकृष्ण काळे, राजू गुंडेराव मिरे, विनोद साबळे, हरिभाऊ काळे उपस्थित होते.

## १४ फेब्रुवारीला भद्रावतीत प्रा.श्याम मानव यांचे लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर जाहीर व्याख्यान

### नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील ऐतिहासिक नगरीत आम्ही भद्रावतीकर द्वारा आयोजित लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील व्याख्याते प्रा. श्याम मानव (राजकीय विश्लेषक तथा संस्थापक संघटक अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती) यांचे जाहीर व्याख्यान दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोज बुधवार ला सायंकाळी ६ वाजता निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले आहे.



सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विधीतज्ञ ड.पुरुषोत्तम सातपुते, अध्यक्षस्थानी, संविधान अभ्यासक ड.भूपेंद्र रायपुरे राहणार आहेत. जगण्याचा आणि विकसित होण्याचा अधिकार आपल्याला ज्या संविधानाच्या माध्यमातून मिळाला कदाचित आपण ते विसरत आहोत का? सभोवतालची परिस्थिति आणि भविष्यातील समाज रचना आपण ओळखून आहोत का? आज देशासमोर मोठी संकटे उभी आहेत? आपल्या पुढच्या पिढ्यांचे भविष्य किती अंधारात आहे .देशाची राजकीय स्थिती काय आहे.आपल्याला संविधान हवे की ,दुसरे काही? आपण सर्व स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून वावरतो आहे खऱ्या अर्थाने आपण जागृत आहोत का? या सर्व बाबींवर अभ्यासपूर्ण विवेचन भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील व्याख्याते प्रा.श्याम मानव विशेष मार्गदर्शन करणार आहे. सदर व्याख्यान कार्यक्रमाला युवा युवती संघटन ,नागरिकांनी व विविध सामाजिक स्तरावरील सर्व क्षेत्रातील मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ .विवेक शिंदे ,डॉ. कार्तिक शिंदे भद्रावती शिक्षण संस्था, सहसंयोजक स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरियल रवींद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्ट चंद्रपूर, भद्रावती पत्रकार संघ, अखिल भारतीय ग्रामीण संघ यांनी केले आहे.

## दिनकरराव कावळे यांचे निधन

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

तळोधी( बा) येथील प्रतिष्ठित नागरिक दिनकरराव कावळे यांना



आज दिनांक ०७ फेब्रुवारीला सायंकाळी ०४ वाजता देवाज्ञा झाली. ते ८५ वर्ष वयाचे होते. विशेष म्हणजे शेवटच्या श्वासापर्यंत पलंगावर लेटून हातात जपमाळ घेऊन ईश्वराचे जप करीत होते.१५ दिवसापासून त्यांची प्रकृती बिघडली होती.घरच्या सर्व सदस्यांनी खुप सेवा केली.त्यांचे मागे पत्नी दोन मुले सुना दोन मुली जावई आणि नातवंड असा गणगोत परिवार आहे. त्यांचे मृत्यू मुळे परिवारात आणि गावात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांची अंतिम यात्रा उद्या सकाळी १०:३० वाजता निघणार आहे. सह्याद्रीचा राखणदार परिवार त्यांच्या दु:खात सहभागी आहे.

### शरद पवार म्हणजेच आमचा पक्ष-जयंत पाटील

मुंबई-निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय धक्कादायक आहे. आम्ही आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणार आहोत. आमचा पक्ष म्हणजे शरद पवार आहे. ते जिथे असतील तिथे कार्यकर्ते उभे राहतील, असा विश्वास राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला.खरी राष्ट्रवादी ही अजित पवार यांचीच आहे, असा निर्णय निवडणूक आयोगाने दिल्यानंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, देशात नवनवीन गोष्टी घडवल्या जात आहेत. त्यामुळे त्याचा विचार जास्त करायचा नाही. आपला लढा चालूच राहणार आहे.निवडणूक आयोगाचा हा निर्णय धक्कादायक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार साहेबांच्या हातातून पक्ष हिसकावून घेतला जातोय. देशातील जवळपास सर्वच संविधानिक संस्थांनी स्वायत्तता गमावली असल्याने तर्कहीन निर्णय देऊन तांत्रिक कारणे पुढे केली गेलेली सकृतदर्शनी दिसत आहे.या निकालाचा सविस्तर अभ्यास करुन आम्ही त्यावर भाष्य करू. या निकालाला आम्ही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असून देशाचे सर्वोच्च न्यायालय आम्हाला न्याय देईल याची आम्हाला खात्री आहे.

## महाऔष्णिक विद्युत केंद्रातील प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी प्रकल्पग्रस्तांना सरळ सेवेत सामावून घ्या-आमदार प्रतिभा धानोरकर

### मुंबई येथे महानिर्मितीच्या प्रकाषगढ येथे प्रकल्पग्रस्तांच्या विविध विषयांवर बैठक संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाऔष्णीक विद्युत केंद्रातील प्रगत कुषल प्रशिक्षणार्थ्यांच्या विविध समस्यांच्या संदर्भात मुंबई येथे दि. ०६ फेब्रुवारी रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी प्रगत कुशल प्रशिक्षणार्थ्यांच्या विविध समस्यांच्या संदर्भात बैठकीत चर्चा केली.

महाऔष्णिक विद्युत केंद्रातील प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी प्रकल्पग्रस्तांना सरळ सेवेत सामावून घ्यावे व इतर मागण्यांच्या संदर्भात मुंबई येथील बांद्रा स्थित प्रकाशगढ येथे महानिर्मितीच्या कार्यालयात प्रकल्पग्रस्तांच्या समस्येसंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी शेतकऱ्यांनी शेतजमिनी देऊन अनेक वर्षांचा कालावधी लोटला असून अनेक शेतकरी भुमीहीन झाले असून त्यांच्या पाल्यांना सरळ सेवेत सामावून घ्यावे अशी मागणी



केली. त्यासोबतच या उमेदवारांना विमा कवच व इतर सोयी उपलब्ध करुन देण्याची मागणी बैठकी दरम्यान केली. कोराडी येथे १७ जानेवारी पासून सुरु असलेल्या आमरण उपोषण सोडविण्याच्या संदर्भांने राज्य सरकार कुठलेही पाऊल उचलत नाही याची देखील खंत असल्याचे मत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले. यावेळी महानिर्मितीचे संचालक धंनजय सावळकर यांनी महावितरण तर्फे येत्या आठ दिवसांत ८०० जागा काढून ४०० प्रकल्पग्रस्तांना नौकरी देण्याचे आश्वासन दिले. परंतू आमदार धानोरकर यांनी एवढ्या जागा काढून प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळणार नसल्याचे सांगितले. सरकार ने विज कंपनी अंतर्गत असलेल्या तीन कंपन्यांच्या माध्यमातून किमान २५०० पदांची जाहिरात काढावी जेणेकरुन ५० टक्के प्रकल्पग्रस्त उमेदवारांना शासकिय सेवेत स्थान मिळेल. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या विविध समस्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यांनतर समोरील बैठकीसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थ्यांच्या संदर्भात तात्काळ बैठकीचे आयोजन करावे अशी विनंती आमदार धानोरकर यांनी केली.

या बैठकी वेळी नाशिकच्या राष्ट्रवादीचे आमदार सरोज अहिरे, महानिर्मितीचे संचालक धंनजय सावळकर, महानिर्मितीचे मुख्य व्यवस्थापक आनंद त्यासोबतच महाराष्ट्रातील विविध वीज प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांची उपस्थिती होती.

# गानकोकिळा भुर्रऽऽऽ उडाली तेव्हा...!

**स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी जेव्हा लतादीदींच्या आवाजातील 'ए मेरे वतन के लोगों, जरा आँखों में भर लों पानी!' हे गाणे ऐकले, तेव्हा त्यांचे डोळे पाण्यांनी डबडबले होते. ज्यांचा शासनाने महाराष्ट्र भूषण व भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव केला आहे, अशा जादुई आवाजाच्या धनी गानसम्राज्ञीं लताजींच्या पावन चरणी श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखरुपातील श्रद्धासुमने अर्पण करीत आहोत... संपादक.**

लता मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना 'भारतीय गानकोकिळा' म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना 'लता दीदी' म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते.

लतादीदी मंगेशकरांचा जन्म मध्यप्रदेश-ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला.

लतादीदींनी नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या किती हंसाल? या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना नवयुगच्या पहिली मंगळागौर या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी नटली चैत्राची नवलाई हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले. इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ-भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या 'आपकी सेवा में' या हिंदी चित्रपटासाठी 'पा लागूं कर जोरी' हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात-'बडी माँ'मध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी 'माता तेरे चरणों में' हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी



चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली.

इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ- देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलामअली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. त्या काळात हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांचे गीतकार प्रामुख्याने मुस्लिम कवी असत. त्यामुळे गाण्यांच्या भावकाव्यात भरपूर उर्दू शब्द असत. एकदा सुप्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी लताजींच्या भारतीय हिंदी गाण्यातील मराठी उच्चारांसाठी तुच्छतादर्शक शेरा मारला, तेव्हा त्यांनी शफी नावाच्या मौलवींकडून उर्दू उच्चारांची अक्षरे गिरवून घेतली होती. लोकप्रिय चित्रपट 'महल'चे 'आयेगा आनेवाला' हे गाणे त्यांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे ठरले. या गाण्याचे संगीतकार खेमचंद प्रकाश होते, तर चित्रपटात गाणे अभिनेत्री मधुबालाने म्हटले होते. गुलाम हैदरांनी लताजींची ओळख तेव्हा 'शहीद' या हिंदी चित्रपटावर काम करीत असलेले निर्माते शशिधर मुखर्जींशी करून दिली. मात्र मुखर्जींनी लताजींचा आवाज अतिशय बारीक असल्याच्या बहाण्याने नाकारला. तेव्हा हैदरांचे थोड्या रागात उत्तर होते, येणाऱ्या काळात निर्माते आणि दिग्दर्शक लताजींचे पाय धरतील आणि आपल्या चित्रपटांसाठी गाण्याची याचना करतील. त्यांनी लताजींना 'मजबूर' या चित्रपटात 'दिल मेरा तोडा' हे गाणे म्हणण्याची अमूल्य संधी दिली.

लतादीदी मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह ग्रंथाली प्रकाशनाने सन १९९५च्या आसपासच्या वर्षी प्रसिद्ध केला होता. त्याचे संपादन मधुवंती सप्रे यांनी केले होते. पुढे हे पुस्तक मिळणे कठीण झाले. तेव्हा जयश्री देसाई यांच्या पाठपुराव्यामुळे मैत्रेय प्रकाशनने फुले वेचिता या नावाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. लतादीदींनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. आवाजाला ईश्वरी देणगी लाभलेल्या लतादीदी मंगेशकर यांना श्वसनाचा त्रास, न्युमोनिया व कोरोनाची लागण झाल्याने त्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होत्या. अशातच लतादीदींनी दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात चिरनिद्रा घेतली. त्यांचे कुटुंबीय,मित्रमंडळी व चित्रपटसृष्टी शोकसागरात बुडाली. संपूर्ण भारत देशावर शोककळा पसरली. त्यांच्या जाण्याने जनता दुःखी कष्टी झाली.

!! लतादीदींना व त्यांच्या अविस्मरणीय स्मृतींना श्रद्धांजली अर्पूण विनम्र अभिवादन !!

**संकलन व सुलेखन**
**श्री.कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु.पो.ता.जि.गडचिरोली**
**फक्त व्हॉ.नं.९४२३७१४८८३.**

# आनंदग्रामचे आजचे लोभस दर्शन!

**डॉ.इंदुताई पटवर्धन या समाजाने दूर अंध:कारात लोटलेल्या कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद फुलवणाऱ्या, डुडुळगाव येथील आनंदग्रामच्या संस्थापिका, ज्येष्ठ समाजसेविका होत्या. त्यांचा जन्म दि.१४ मे १९२६ रोजी जमखंडी याठिकाणी झाला. इंदूताई पटवर्धन यांनी आपल्या वयाच्या १६व्या वर्षी गांधीजींच्या चळवळीस वाहून घेतले. माँटेसरी शिक्षणक्रम पूर्ण करून त्या शिक्षिका बनल्या. पुढे ब्रिटिश इंडियन रेड क्रॉस आणि सेंट जॉन अॅम्ब्युलन्सच्या कामामध्ये दाखल झाल्या. त्यांच्याबद्दल अभ्यासपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी देताहेत... संपादक.**

पटवर्धन घराणे हे पेशवाईतील एक निष्ठावंत व कर्तबगार घराणे होते. हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवड गावचे होय. या घराण्याचा मूळ पुरुष हरिभट पटवर्धन. त्याला कृष्ण, बाळ, त्रिंवक, गोविंद, रामचंद्र, माधव य भास्कर असे सात मुलगे होते. पैकी त्रिंबक, गोविंद व रामचंद्र हे प्रसिद्धीस आले. हरिभट गाव सोडून बहिरेवाडी येथे आला. तेथे त्याचा इचलकरंजीकर घराण्याचे संस्थापक नारो महादेव जोशी यांच्याशी कुलोपाच्याया म्हणून संबंध आला. इचलकरंजीकर व पेशवे यांचे विवाहसंबंधाचे नाते होते. त्यामुळे याचा बाळाची विश्वनाथाशी संबंध आला. गोविंदरावाने इंद्रोजीच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी त्यास त्याच्या सैन्याचे आधिपत्य दिले. अशा रीतीने पटवर्धनांनी मराठी राज्याच्या सेवेस सुरुवात केली. भाऊ रामचंद्रराव याने वसईच्या मोहिमेत मराठ्यांच्या बाजूने मोठा पराक्रम गाजवला. गोविंदरावाच्या पराक्रमामुळे व स्वामिभक्तीमुळे त्याचे नाव सर्वत्र झाले होते. बाळाजी बाजीरावाने आपले पाच हजारांचे पथक गोविंगरावाच्या स्वाधीन करून त्याची नवीन कामगिरीवर नेमणूक केली. या दोन्ही भावांबरोबर हरिभटाचे आणखी दोन मुलगे-त्रिंबकराव व भास्करराव हेही त्यांना सामील झाले. तसेच पटवर्धनांचा इतर परिवारही पेशव्यांच्या सैन्यात व चाकरीत दाखल झाला. माळवा १७२८- १७४०, दिल्ली २७३७- १७३९, बुंदेलखंड १७४१, गुजरात १७३१- १७५५ आणि कर्नाटक-सावनूरचा नबाब, हैदर व टिपू यांविरुद्ध झालेल्या लढायांत पटवर्धन घराण्यातील अनेक पुरुषांनी मोठा पराक्रम करून पेशव्यांना यश प्राप्त करून दिले. त्यामुळे त्याला १७५५ मध्ये नगाऱ्याचा मान देण्यात आला. सदाशिवराव भाऊ व पटवर्धन यांचे एवढे सूत नव्हते. शिवाय गोविंदराव दक्षिणेच्या स्वारीत गुंतल्यामुळे पटवर्धनांपैकी पानिपतच्या लढाईत कोणीही हजर नव्हते. पण भाऊसाहेबाच्या साह्यास जाणाऱ्या बाळाजी बाजीरावाबरोबर पटवर्धन उत्तरेत गेले होते. शिवाय सन १७५०नंतर दक्षिणेची बाटू मुख्यतः पटवर्धनांनी सांभाळली होती.

पटवर्धन घराण्याने सन १७४० ते १८००पर्यंत मराठी राज्यासाठी अतोनात कष्ट घेतले. अनेक लढायांमध्ये ते आघाडीवर होते. ६० वर्षांच्या कारकीर्दीत या घरण्यातील तीस कर्ते पुरुष धारातीर्थी पडले. रघुनाथराव व माधवराव पेशवे यांच्या भांडणामुले पटवर्धन घरण्यास काही काळ प्रतिकूल गेला. रघुनाथरावाने पटवर्धनांच्या मुख्य ठिकाणावर म्हणजे मिरजेवरच चढाई केली. याचा तात्कालिक परिणाम म्हणजे गोविंदरावाचा



मुलगा गोपाळराव निजामाकडे गेला. परंतु पुढे माधवराव पेशव्यांनी पटवर्धनांना आपल्या बाजूस वळवून घेऊन राक्षसभुवन येथे निजामाचा पराभव केला. पेशव्यांनी पटवर्धनांना २५ लाखांचा सरंजाम आणि त्यासाठी मिरज व तुंगभद्रा-कृष्णेमधील प्रांत दिला आणि ८,००० घोडदळ सरकारी तैनातीत ठेवण्याची आज्ञा केली. गोविंदरावाचा मुलगा गोपाळराव आणि रामचंद्ररावाचा मुलगा परशुरामभाऊ हे आपल्या वडिलांसारखेच शूर व कर्तबगार निघाले. भाऊंनी तासगाव येथे आपले वास्तव्य कायम केले.

पटवर्धनांना मोठा सरंजाम मिळाल्यामुळे त्यांचे रजकीय महत्त्व वाढले. कर्नाटकातील हैदर व टिपू यांच्या विरुद्ध झालेल्या लढायांचा सर्व भार त्यांच्यावरच होता. ती कामगिरी पार पाडून त्यांनी कर्नाटक आपल्या ताब्यात ठेवले. सन १७७१ साली हैदरविरुद्ध झालेल्या स्वारीत गोपाळरावास मृत्यू आला व पुढे काही दिवसांतच गोविंदरावही मरण पावले. नारायणरावाच्या वधानंतर पटवर्धनांनी सवाई माधवरावाची बाजू उचलून धरली. गुजरातच्या स्वारीत गोविंदरावाचा दुसरा मुलगा वामनराव हरिपंत फडक्यांबरोबर होता. तो सन १७७५मध्ये मरण पावला. गोविंदरावाचा तिसरा मुलगा यास सरंजाम देऊन कर्नाटकात हैदरविरुद्ध पाठविले. सन १७७७च्या सावशीच्या लढाईत तो गंभीर जखमी झाला. या लढाईत पटवर्धनांची फारच हानी झाली. पटवर्धनांपैकी कुरुंदवाडचे कोन्हेरराव पडले आणि गोविंदरावाचा तिसरा मुलगा पांडुरंगराव, शीपतराव व वासुदेवराव यांना कैद झाली. चिंतामणरावाच्या नावे सन १७८३मध्ये सरंजाम दिला. सन १७९०-९१मध्ये टिपूविरूद्ध झालेल्या लढाईत परशुरामभाऊस महत्त्वाचे स्थान होते. सन १७९५च्या खर्ड्याच्या लढाईत चिंतामणराव हजर होते, तर विठ्ठल धोंडो याने खूपच मोठा पराक्रम केला. दुसऱ्या बाजीरावाने पटवर्धनांचा अनन्वित छळ केला. परशुरामभाऊंना कैदेत टाकले; परंतु पटवर्धनांनी मराठी राज्याच्या सेवेत कोणतीच कसूर न करता आपले प्राण वेचले. सन १८१७मध्ये खडकीच्या बाजीराव-इंग्रज लढाईत तसेच सन १८१८मध्ये कोरेगाव व आष्टी या लढायांत पटवर्धनांनी भाग घेतला होता. तद्नंतर त्यांनी इंग्रजांचे मांडलिकत्व पतकरले.

दुसर्या महायुद्धात डॉ.इंदूताई प्रत्यक्ष कामासाठी ब्रह्मदेश, जावा येथे गेल्या. सिंगापूर, जपान, येथेही त्यांनी काम केले. त्यांचे भाऊ राजा परशुराम शंकरराव पटवर्धन हे भारतीय राजघराण्यांपैकी पहिले! पुणे म्युनिसिपल ट्रान्स्पोर्ट त्यांनीच स्थापन केली. आपल्या सामाजिक विचारांची त्यांनी मोठी घडण केली, असे डॉ.इंदूताई म्हणतात. सेवेतून १९५३मध्ये निवृत्त झाल्यावर होमिओपॅथीचे त्यांनी शिक्षण घेतले. खेड शिवापूर येथे दवाखाना सुरू केला. आदिवासी आणि सैन्यातील जवानांसाठी त्यांनी सतत परिश्रम घेतले. कुष्ठरोग्यांसाठी त्यांनी काम सुरू केले ते १९६५मध्ये. आळंदी जवळच्या आनंदग्राम येथे सन १९७०मध्ये त्यांनी स्थलांतर केले. उला लेडी हाइड पार्कर, राधा रमणजी, अशा व्यक्तींच्या सक्रिय साह्यामुळे आनंदग्रामला सद्याचे विशाल स्वरूप आल्याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. सन १९६५मध्ये महाराष्ट्र शासनाचा भिक्षा प्रतिबंध कायदा अमलात आला, तेव्हा ८० रुग्णांसह फुगेवाडी येथे त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी काम सुरू केले. आनंदग्रामची उभारणी कुष्ठरोग्यांनीच केली.

सद्या येथे शेती, कुक्कुटपालन, गोपालन, चर्मकाम, कापड उद्योग आदी अनेक उपक्रम यशस्वीपणे चालविले जातात. सुबाभूळ, रेशमासाठी तुती, इत्यादींची लागवड केली जाते. मुला-मुलींनी फुलून आलेल्या शाळा, शेतीला नियोजन करून दिलेले पाणी, सदैव कार्यरत असलेले हात, हे आनंदग्रामचे आजचे लोभस दर्शन आहे. कुष्ठरोग्यांसाठी कार्य करणारी संस्था उभी करणार्या डॉ.इंदुताई पटवर्धन या एकमेव महिला आहेत. अशा या थोर समाजसेविकेचे दि.८ फेब्रुवारी १९९९ रोजी दुःखद निधन झाले.

!! डॉ.इंदूताई पटवर्धन यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार आनंदी-**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**एकता चौक, रामनगर, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी आगामी आर्थिक वर्षाकरीता ४५६ कोटी मंजूर

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नामुळे १५२ कोटींची वाढ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटीबद्ध असलेले राज्याचे वने,सांस्कृतिक कार्य,मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नामुळे आगामी२०२४-२५या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत जिल्ह्याच्या विकासासाठी४५६कोटी रुपये मंजूर झाले आहेत. विशेष म्हणजे जिल्ह्यासाठी असलेल्या मंजूर नियतव्ययापेक्षा१५२कोटी रुपये जिल्ह्याला अतिरिक्त मिळणार आहेत.

शासनाने सन२०२४-२५मध्ये चंद्रपूर जिल्ह्याकरीता३०४कोटींचा नियतव्यय मंजूर केला होता. मात्र हा निधी चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी अतिशय कमी असल्याने यात वाढ करून जिल्ह्यासाठी४५०कोटी मंजूर करावे,अशी आग्रही मागणी पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी८जानेवारी२०२४रोजी राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीत केली होती. या मागणीला वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी तत्काळ अनुकूलता दर्शविली. त्यानुसार पालकमंत्री मुनगंटीवार यांनी केलेल्या वाढीव मागणीनुसार चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने४५६कोटी रुपये मंजूर केले. याबाबतचे आदेश जिल्हा नियोजन समितीला६फेब्रुवारी२०२४रोजी प्राप्त झाले आहेत.

राज्यस्तरीय बैठकीमध्ये चंद्रपूर जिल्ह्याकडून करण्यात आलेल्या सादरीकरणानंतर जिल्हा योजनेचा नियतव्यय अंतिम करताना कार्यान्वयीन यंत्रणांची मागणी,जिल्ह्याचे वैशिष्ट,गरजा तसेच शासनाची प्राथमिकता इत्यादी बाबी विचारात घेऊन जिल्हा वार्षिक



योजना (सर्वसाधारण) सन२०२४-२५करीता एकूण रुपये४५६कोटी (आकांक्षित तालुका व नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्ययासह) नियतव्यय शासनाने अंतिमत: मंजूर केला आहे.महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सन२०२७-२८पर्यंत१ट्रिलियन डॉलरपर्यंत उभारण्याचे महत्वाकांक्षी लक्ष निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार शासनाने दिलेल्या सूचनांनुसार जिल्हा विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. सदर आराखड्यातील चंद्रपूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने विविध विकास क्षेत्र व उपक्षेत्र यासंदर्भात आखण्यात आलेल्या उपक्रम/योजना/प्रकल्प यासाठी राज्य/केंद्र व जिल्हा वार्षिक योजनेद्वारे निधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा वार्षिक योजनेच्या अंतिम मंजूर नियतव्ययापैकी किमान२५टक्के निधी जिल्हा विकास आराखड्यानुसार निश्चित केलेल्या जिल्ह्याच्या आर्थिक वाढीच्या धोरणांवर खर्च करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.नीती आयोगाकडून चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती हा तालुका आकांक्षित तालुका म्हणून घोषित करण्यात आला आहे. आकांक्षित तालुक्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिवती तालुक्यासाठी५कोटी इतका निधी विशेष बाब म्हणून देण्यात येणार आहे.राज्यात गतीने होत असलेले नागरीकरण लक्षात घेता नागरीकरणाच्या प्रमाणात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सर्व महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायती यांना विशेष अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता विचारात घेऊन,सन२०२४-२५या वर्षाकरीता चंद्रपूर जिल्ह्यासाठी३७.८३कोटी इतका विशेष अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करण्यात आला आहे.नियोजन विभागाच्या१८ ऑक्टोबर २०२३अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद नावीन्यपूर्ण योजना,शाश्वत विकास ध्येय आणि मूल्यमापन सनियंत्रण व डाटा एन्ट्रीसाठी५टक्के निधी,महिला व बालविकास विभागाच्या सर्वसमावेशक योजनांसाठी३टक्के,गृह विभागाच्या योजनेसाठी ३ टक्के,शालेय शिक्षण विभागाच्या सर्वसमावेशक योजनांसाठी५टक्के, सांस्कृतिक कार्य विभागाच्या गड-किल्ले,मंदिरे व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादीचे संवर्धन या योजनेसाठी३टक्के,महसूल विभागाच्या गतिमान प्रशासन तथा आपत्कालिन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेसाठी कमाल५टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

# जेतवन बुद्ध विहारात त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेला सत्यफुलाबाई चव्हाण व शोभाबाई गजभिये यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून अभिवादन केले. डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाला खऱ्या अर्थाने खंबीरपणे साथ देणाऱ्या, बाबासाहेबांना घडविणाऱ्या त्यांच्या पत्नी माता रमाई यांनी प्रचंड हाल अपेष्टा सहन करुन बाबासाहेबांच्या कुटुंबाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.या मातेने आपल्या इच्छा -आकांक्षाना मूठमाती देऊन बाबासाहेबांना समाजहीतासाठी लढण्यास प्रोस्ताहीत केले. माता रमाई बाबासाहेबांच्या आयुष्यात आल्या नसत्या तर एवढ्या प्रचंड विद्वतेचा निस्वार्थ नेता कधीच घडला नसता, अशा शब्दात मान्यवरांनी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं.या प्रसंगी भिमज्योती महिला मंडळ, बौध्द पंच कमेटी मालेवाडा तथा गावातील नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कार देण्याचं काम जिजाऊ विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे-मा.आ.पृथ्वीराज साठे

## जिजाऊ विद्यालयात कला महोत्सव स्नेहसंमेलन २०२४ उत्साहात संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच संस्कार देण्याचे काम शहरातील जिजाऊ विद्यालयाच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे मत माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी व्यक्त केले. ते जिजाऊ विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात बोलत होते. शहरातील जिजाऊ विद्यालय या सेमी माध्यमाच्या शाळेमध्ये ४ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन कलामहोत्सव २०२४ उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार स्मिता बाहेती,अंबाजोगाई वकील संघाचे अध्यक्ष अशोकजी कवडे, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, शांतिदूत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अंकुशराव लोंढाळ, ह.भ.प रामकिसन महाराज जाधव व संस्थेचे संस्थापक सचिव ड.दयानंद लोंढाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्नेहसंमेलनाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून झाली. स्नेह संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच माता पालकांसाठी हळदी कुंकू समारंभात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे देखील बक्षिस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी शाळेच्या कार्याचे कौतुक करत पालकांनी विद्यार्थी घडवण्यासाठी घ्यावयाची काळजी व प्रयत्न याबाबत उपस्थित पालकांना यथोचित असे मार्गदर्शन केले. या कला महोत्सव स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी भक्ती गीत, कोळी गीत, बालगीत, लावणी, देशभक्तीपर गीत, स्त्रीभ्रूणहत्या एकांकिका, सोशल मीडियाचा दुष्परिणाम एकांकिका असे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले व पालकांनी तसेच उपस्थित नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.याप्रसंगी संस्थेचे सचिव ड.दयानंद लोंढाळ यांनी जिजाऊ विद्यालय शिक्षणाबरोबरच संस्कार देण्यासाठी सदैव तत्पर असल्याची ग्वाही देत विद्यार्थी विकासासाठी विविध प्रकारचे सहशालेय उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शाळा सदैव प्रयत्नशील राहील असा पालकांना शब्द दिला.आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी जिजाऊ विद्यालयाचे कार्य हे कौतुकास्पद असून ही शाळा विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कारही देण्याचं काम करत आहे त्यामुळे हे विद्यार्थी भविष्यात चांगले नागरिक होऊन वेगवेगळ्या क्षेत्रात आपले नाव उज्वल करतील अशा शब्दात विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी विद्यार्थ्यांचे कलाविष्कार पाण्यासाठी पालक व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मोहिनी जाधव यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती मयुरी केंद्रे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनीषा शिंदे, रंजना माळी, सारिका चौधरी, अनुराधा काळे, अनुराधा पांचाळ या सर्वांनी परिश्रम घेतले.



### ‘रामराज्या’साठी ‘सबका विश्वास’ महत्वाचा

## श्रीमती फौजिया खान यांची राज्यसभेत मोदी सरकारवर जोरदार टीका

**परभणी । प्रतिनिधी**

खर्या अर्थाने सबका साथ, सबका विकास, सबका विश्वासच या देशात रामराज्य आणू शकेल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार श्रीमती फौजिया खान यांनी मंगळवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यसभेत व्यक्त करतेवेळी मोदी सरकारवर जोरदार टिका केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताची संकल्पना मांडतांना युवक, महिला, गोर-गरिब आणि शेतकरी या चार स्तंभांना महत्व देताहेत खरे, परंतु प्रत्यक्ष अंमलबजावनीत, कृतीत ते फारसे दिसून येत नाही, अशी टिका खासदार श्रीमती खान यांनी केली.

केंद्र सरकारने महिला सक्षमीकरणाच्या मोठ्या गप्पा मारल्या. महिलांसाठी ‘नारी शक्ती वंदन’ असा ठराव मंजूर केला. दुर्दैवाने या ठरावाची तात्काळ अंमलबजावनी केली नाही. त्यासाठी राजकीय किंमत मोजावी लागेल, या भितीपोटीच सरकारने अंमलबजावनी लांबणीवर टाकली, असा आरोप करतेवेळी श्रीमती खान यांनी महिला सक्षमीकरणाकरीता राजाराम मोहन रॉय असो, महात्मा ज्योतीबा फुले यांनी मोलाच्या भूमिका बजावल्या. त्यापाठोपाठ ज्येष्ठ नेते शरद पवार, तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी या विषयात राजकीय किंमत मोजावी लागेल याची भिती न



बाळगता महिलांसाठी ठोस असे निर्णय घेतले, असे निदर्शनास आणून श्रीमती खान यांनी आंतरराष्ट्रीय खेळाडू साक्षी मलिक प्रकरण असो की बिल्कीस बानो प्रकरणातील आरोपींना पाठीशी घालण्याचे धोरण असो, मणिपूरमधील महिलांवरील अत्याचार असो की महिलांवरील अत्याचाराचे चार टक्क्यांनी वाढलेले प्रमाण असो याकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. उल्हास नगरातील पोलिस ठाण्यात भाजपाच्या आमदाराद्वारे गोळीबाराचा निषेधार्ह प्रकार, १३ हजार युवकांच्या आत्महत्येचा विषय, शेतकर्यांच्या वाढत्या आत्महत्यांचा विषय असो, एकूण युवक, महिला, सर्वसामान्य शेतकर्यांना हे सरकार कुठेच दिलासा देवू शकले नाहीत, अशी जोरदार टिका करतेवेळी श्रीमती खान यांनी मग खर्या अर्थाने या देशात आपण सबका साथ, सबका विकास, सबका विश्वासावर रामराज्य आणू शकू का? असा सवाल केला.

## जिंतूरात राष्ट्रवादीचा जोरदार आक्रोश मोर्चा माजी आमदार भांबळे यांची जोरदार टीका

**जिंतूर । प्रतिनिधी**

जिंतूर व सेलू तालुक्यातील शेतकर्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने सातत्याने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) माजी आमदार विजय भांबळे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार ६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी जनसंपर्क कार्यालयापासून ते तहसील कार्यालयापर्यंत शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

जिंतूर व सेलू तालुक्यात चालू वर्षात कमी पाऊस झाल्यामुळे शेतकरी राजा आडचणीत आला आहे. शेतकर्यांच्या मालाला योग्य भाव नाही, झालेल्या शेतीपिकाची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, तसेच पिक विमा देखील मंजूर करण्यात आलेला नाही, अशी खंत माजी आमदार भांबळे यांनी व्यक्त केली. सध्या जिल्ह्यातील कोरडा दुष्काळ पाहता पाणी टंचाई, चारा छावण्या, पुरेसी वीज ई. नियोजन करणे गरजेचे आहे, परंतुशासनाची शेतकर्यांच्या मागण्यांबाबत उदासीन भूमिका दिसून येत आहे, अशी टिका केली. जिंतूर व सेलू तालुक्यात



भीषण दुष्काळ असताना देखील शासनाने सौम्य दुष्काळ जाहीर केलेला आहे. दुष्काळाची परिस्थिती तरी सौम्य दुष्काळ नसून तीव्र दुष्काळ जाहीर करण्यात यावा व तीव्र दुष्काळाच्या सर्व आर्थिक मदती व दुष्काळ काळातील सर्व कामे युद्ध पातळीवर सुरु करण्यात यावे, अशी मागणी भांबळे यांनी मोर्चाच्या समारोपाप्रसंगी सभेतून केली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयापासून निघालेल्या मोर्चात माजी आमदार भांबळे, प्रेक्षा भांबळे, प्रसादराव बुधवंत, अशोक नाना काकडे, विश्वनाथ राठोड, रामराव उबाळे, मुरलीधर मते, बाळासाहेब घुगे, अभिनय राऊत, बाळासाहेब रोडगे, राजेंद्र लहाने, विठ्ठलराव घोगरे, गणेशराव इलग, शरद मस्के, मनोज थिटे, सुधाकर रोकडे, मनीषा केंद्रे, आशा खिल्लारे, शरदराव अंभूरे, शरदराव मस्के, प्रकाशराव शेवाळे, मुंजाभाऊ तळेकर, मधुकर भवाळे, विजय खिस्ते, दत्तराव काळे, मनोहर डोईफोडे, अहेमद बागबान, दलमीर पठाण,सोहेल सर, शोएब जानिमिया,चंद्रकांत बहिरट, उस्मान पठाण, इस्माईल शेख, बंटीभाऊ निकाळजे, सलीम काझी, अकबर कुरेशी, हकीम लाला, बालाजी नव्हाट, बालाजी सांगळे, अभिजित भांबळे, सचिन राठोड, पिंटू मस्के, तूपसुंदर, शंकर जाधव, राहुल घुले, प्रवीण चव्हाण, शौकत लाला, अक्कू लाला, खय्युम कादरी, अविनाश मस्के इत्यादींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असंख्य कार्यकर्ते व हजारोच्या संख्येने शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## कौशल्य विकास आणि नाविन्यपूर्ण अभ्याक्रमावर शासनाचा भर-मंत्री तटकरे

**पुणे**–विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक कौशल्य विकास आणि नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमावर शासनाचा भर आहे, तसेच महिला आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरण बनविण्याचे काम सुरू असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.भूगाव येथील फ्यूएल बिझनेस स्कूलच्या वार्षिक संमेलन व भविष्यवेधी कौशल्य चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी फ्यूएलचे संस्थापकीय अध्यक्ष केतन देशपांडे, मुख्य मार्गदर्शक संतोष हुरलीकोप्पी, मनोज पोचाट यांच्यासह विविध कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधी विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



अलिकडच्या काळात शिक्षण क्षेत्रात वेगाने बदल झाले आहेत असे सांगून मंत्री तटकरे म्हणाल्या, दहा पंधरा वर्षापूर्वी पदवी मिळविणे, किंवा त्यापूर्वीच्या पिढीत दहावी- बारावी उत्तीर्ण होणे ही मोठी बाब होती. आज केवळ पदवी, पदव्युत्तर पदवी मिळविणे एवढेच नव्हे तर उज्ज्वल भवितव्य देऊ शकेल असे अभ्यासक्रम, प्रशिक्षण निवडणे गरजेचे ठरले आहे. त्यासाठी कौशल्य विकासाचे आणि व्यावसायिक अभ्यासक्रम पूरक ठरू शकतात. त्यामुळे फ्युएल बिझनेस स्कूलने असे अभ्यासक्रम समाजाच्या सर्व घटकातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी घेतलेला पुढाकार प्रशंसनीय आहे.त्या पुढे म्हणाल्या, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेण्यास अडचण निर्माण होत असते. फ्यूएल बिझनेस स्कूल विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाचे अत्याधुनिक कौशल्यांचे दर्जेदार शिक्षण देत असून ही संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्याचे मोलाचे कार्य करीत आहे. संस्थेने पुण्यातच नाही तर इतर ठिकाणीही विद्यार्थ्यांच्या हिताच्यादृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करावे. संस्थेने शासनाच्या कौशल्य विकास, नाविन्यता विभागासोबत सामंजस्य करार केले असल्यास त्यांना शासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल. शासन आणि शिक्षण संस्थांनी एकत्र काम केल्यास निश्चितच चांगले यश प्राप्त होईल.

## जो नाही झाला काकांचा, तो काय होणार लोकांचा-जितेंद्र आव्हाड

**मुंबई**–केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि चिन्हावर निकाल जाहीर करत मोठा आणि ऐतिहासिक असा निर्णय दिला आहे. निवडणूक आयोगाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि घड्याळ चिन्ह दिले आहे.याच निकालाच्या पार्श्वभूमीवर आता शरद पवार गटाचे नेते, जितेंद्र आव्हाडांनी काही ट्विट करत अजित पवारांवर निशाणा साधला आहे. ‘जो नाही झाला काकांचा, तो काय होणार लोकांचा’ असे पोस्ट करत आव्हाड यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली आहे.दरम्यान दुसऱ्या ट्विटमध्ये जितेंद्र आव्हाड म्हणाले की, भीड में रहकर भी तनहा कौन है, ये तो झुठे से झुठा भी बतादेगा सच्चा कौन हैं । भेडीयों की भीड में शेर आने दो, पता चलेगा जंगल का राजा कौन है ‘ असे ट्विटही त्यांनी केले. त्यापुढे त्यांनी शरद पवार यांचा हॅशटॅग वापरत त्यांच्याकडे अजूनही लढण्याची ताकद असल्याचे सूचित केले



आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून नवी घोषणा जाहीर करण्यात आली. निवडणूक आयोगाकडून निकालानंतर नवी मोहीम जाहीर करण्यात आली आहे. आमचा पक्ष आणि चिन्ह शरदचंद्र गोविंदराव पवार असे मोहीमेचे नाव आहे. शरद पवार गटाकडून या नव्या मोहीमेची माहिती ट्विटरवर देण्यात आली आहे. नुकतंच शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली. आमचा पक्ष आणि चिन्ह म्हणजे शरद पवार, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.पक्षाचे नाव आणि चिन्ह परत मिळवण्यासाठी ते सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करू शकतात. तिथे आयोगाच्या निर्णयाला स्थगितीसाठी प्रयत्न करावा लागेल. पण, शिवसेनेचे नाव आणि चिन्हासाठी उद्धव ठाकरेंनी केलेल्या याचिकेवर अद्याप स्थगिती मिळाली नाही, हे लक्षात घ्यावे लागेल.अजित पवार यांना राष्ट्रवादीच्या नावावर उमेदवार उभा करता येईल, तर शरद पवारांना आपल्या पक्षाकरिता तात्पुरते नाव आणि चिन्ह मिळू शकते. त्यासाठी तीन संभाव्य नावे देण्यास आयोगाने बुधवारी दुपारी तीनपर्यंत वेळ दिली आहे.शरद पवार यांच्या गटाने कोर्टातून या निर्णयावर स्थगिती आणली, तर अजित पवार गटाला लोकसभेत पक्षाचे नाव व चिन्ह वापरता येणार नाही. स्थगिती मिळाली नाही तर अजितदादा घड्याळाच्या चिन्हावर अधिकृत उमेदवार देऊ शकतील.

## चांगले काम करणाऱ्यांना सन्मान मिळत नाही:वाईट काम करणाऱ्यांना शिक्षा होत नाही,मग सरकार कोणाचेही असो-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



**मुंबई**–केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी म्हणाले, कोणत्याही पक्षाने सरकार बनवले तरी एक गोष्ट निश्चित आहे की, चांगले काम करणाऱ्याला सन्मान मिळत नाही आणि जो वाईट काम करतो त्याला कधीही शिक्षा होत नाही. मुंबईतील एका कार्यक्रमात गडकरी बोलत होते.ते म्हणाले की, राजकारणात वाद-विवाद आणि चर्चेत विचार फरक ही समस्या नाही. समस्या म्हणजे कल्पनांचा अभाव. आपल्या विचारधारेला चिकटून राहणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. विचारसरणीची घसरण लोकशाहीसाठी चांगली नाही. ना उजवे ना डावे, ऑपरच्युनिस्ट (संधिसाधू) मानले जाते. अशा लोकांना फक्त सत्ताधारी पक्षाशी जोडून राहायचे असते.गडकरी म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे आणि पंतप्रधान मोदींच्या शब्दात भारत ही लोकशाहीची जननी आहे. चांगले काम करणाऱ्याला सन्मान मिळत नाही आणि वाईट काम करणाऱ्याला कधीच शिक्षा होत नाही. या गुणवत्तेमुळे आपली लोकशाही शासन व्यवस्था जगासाठी योग्य आहे.ते म्हणाले की, नेते येत-जात राहतात, मात्र त्यांनी आपापल्या मतदारसंघातील जनतेसाठी केलेले कामच त्यांना आदराचे स्थान मिळवून देते. प्रसिद्धी आणि लोकप्रियता महत्त्वाची आहे, पण ते संसदेत काय बोलतात यापेक्षा त्यांनी आपापल्या मतदारसंघात केलेले काम महत्त्वाचे आहे.राजद प्रमुख लालू प्रसाद यादव यांच्या भाषण कलेचे गडकरींनी कौतुक केले. माजी संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्या वागण्यातून, साधेपणाने आणि व्यक्तिमत्त्वातून खूप काही शिकल्याचेही त्यांनी सांगितले. अटलबिहारी वाजपेयी यांच्यानंतर त्यांच्यावर प्रभाव टाकणारी व्यक्ती म्हणजे जॉर्ज फर्नांडिस.गडकरींनी बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांचेही कौतुक केले. अशा लोकांमुळेच लोकशाही मजबूत झाल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर ते ऑटोरिक्षाने प्रवास करायचे आणि त्यांची प्रकृती अगदी सामान्य होती. अशा लोकांकडून नेत्यांनी प्रेरणा घ्यावी, असे ते म्हणाले.



# चंद्रपुरात ९ ते ११ फेब्रुवारी दरम्यान दुसऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन

## मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून सिनेरसिकांना मेजवानी ;मिराज सिनेमा येथे विविध शो चे प्रदर्शन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय सिनेमा आणि या क्षेत्रात काम करणारी मंडळी दर्जेदार आणि गुणसंपन्न आहे; परंतु जगातील तसेच भारतातील उत्तम चित्रपट चंद्रपूरच्या रसिकांना बघता यावे यासाठी पुणे फिल्म फेस्टिवलच्या धर्तीवर चंद्रपूर फिल्म फेस्टिवल (सिफ) चे आयोजन मागील वर्षीपासून करण्यात आले आहे. येत्या ९ फेब्रुवारी पासून दुसरा तीन दिवसीय चंद्रपूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मिराज सिनेमा येथे सुरू होत असून सिनेरसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

चंद्रपूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे (सिफ ) उदघाटन ९ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जेष्ठ दिग्दर्शक निर्माते जब्बार पटेल उपस्थित राहणार आहेत. ९ ते ११ फेब्रुवारी २०२४ दरम्यान मिराज सिनेमा येथे संपन्न होणाऱ्या या महोत्सवाची सिनेमा इज़ होप ही थीम आहे. या उद्घाटन सोहळ्याची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार आहे. त्यानिमित्ताने नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा, महानगरपालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल यांच्यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.उद्घाटन सोहळ्यानंतर 'वल्ली ' (मराठी, दिग्दर्शक – मनोज शिंदे) हा उद्घाटनाचा चित्रपट (ओपनिंग फिल्म) दाखवण्यात येणार आहे. महोत्सवात एकूण देश विदेशातील १७ चित्रपटांचे प्रदर्शन होणार आहे. हे सर्व चित्रपट इंग्लिश सबटायटल सहित प्रेक्षकांना पाण्याची संधी लाभणार आहे. मागील वर्षीच्या महोत्सवाला चंद्रपूरच्या चित्रपट प्रेमिकांनी दिलेली दाद म्हणूनच या वर्षी देखील उत्मोत्तम चित्रपटांची निवड करण्यात आली आहे.वल्ली (दिग्दर्शक मनोज शिंदे), ह्युमनिसट व्यंपायर सिकिंग कन्सेंटिंग स्युसायडिकल पर्सन (दि . एरियन लॉइयस सीज़), द फॉक्स (दि . एड्रियन गॉइजिंगर), इरत्ता (रोहित एम गी कृष्णन), गुड्बाइ ज्युलिया (मोहम्मद कॉर्डोफनी), सिटी ऑफ विंड (लखगवादुलम पुरेवोचिर), द साइरन (सेपीडेह फारसी), लव इज़ फॉर ऑल ( जयप्रकाश राधाकृष्णन), द बर्डेनेड (अमर गमाल), बिहाइंड द माउंटन्स (मोहम्मद बिन अट्टाई), आर्ट कॉलेज १९९४ – (लुई जैन), भेरा (श्रीकांत प्रभाकर), सिटिज़न सेंट (तीनातीन काजरिशविली), द बुरीटी फ्लॉवर (जाओ साळविज आणि रेणी नाडेर मेसोरा), डेज़र्ट (फाऊदी बेनसैदी), बहादुर (दिवा शाह) आणि जिप्सी ( दिग्दर्शक शशी चंद्रकांत खंदारे



# राजू गावंडे यांचे आज सेंद्रिय शेती या विषयावर व्याख्यान

## मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयाचा वार्षिकोत्सव

**गोंदिया । प्रतिनिधी**

विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा या शैक्षणिक संस्थेचे सहसचिव तथा नागपूर विभागातील प्रसिद्ध सेंद्रिय शेतीतज्ज्ञ राजू गावंडे यांचे आज ८ फेब्रुवारी २०२४ रोज गुरुवारला दुपारी २ वाजता सेंद्रिय शेती या विषयावर व्याख्यान होणार आहे. बहुजन हिताय नवयुवक शिक्षण संस्था द्वारा संचलित डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्न गोरेगांव तालुक्यातील हिराटोला येथील मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालयात आयोजित वार्षिकोत्सव २०२४ च्या उद्घाटन सोहळाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत सरकारच्या लॉ कमीशनचे माजी सदस्य प्रा. दिनकर एन. संदनशीव (मुंबई) हे असतील. उद्घाटक नागपूर येथील कृषीतज्ज्ञ डॉ. रमेशचंद्र ठाकरे असतील. यावेळी मंचावर मोरगाव अर्जुनीचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीप बंसोड प्रामुख्याने उपस्थित असतील. राजू गावंडे हे सेंद्रिय शेती क्षेत्रातील विदर्भातील अग्रगण्य नाव असून त्यांनी या विषयावर विदर्भात अनेक व्याख्याने दिली आहेत. समोरची पिढी वाचवायची असेल तर सेंद्रिय शेतीशिवाय पर्याय नाही ही त्यांची भूमिका ते मांडत असतात. सेंद्रिय शेती हा त्यांचा आवडता व जिव्हाळ्याचा विषय असून आजवर अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचून त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. शेकडो व्याख्याने दिली आहेत.



# बांबू फर्निचर प्रशिक्षणाच्या माध्यमातुन तरुणांना मिळाले रोजगाराचे साधन

## ३० दिवसीय बांबू फर्निचर प्रशिक्षण कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तार होत असलेल्या बांबू क्षेत्रात युवकांना रोजगाराचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली च्या वतीने ३० दिवसीय बांबू फर्निचर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा नुकताच समारोप करण्यात आला.कार्यक्रमाला प्रशिक्षण केंद्राचे संचालक अशोक खडसे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. मल्लेलवार, प्रशिक्षणाचे तांत्रिक मार्गदर्शक शिरीष कनेर, किशोर गायकवाड, राजू हजारे, शशिकांत मोकाशे, वनपाल कोसनकर व संस्थेचे विद्यार्थी तसेच कर्मचारी उपस्थित होते.या प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवक-युवतींना विविध यंत्रसामुग्री हाताळणे, विविध आकृतीज्ञान व जीवनापयोगी फर्निचर तयार करण्याबाबत तांत्रिक मार्गदर्शनाबरोबरच उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजना व बँकिंग क्षेत्रातील वित्त पुरवठ्याबाबत माहिती देण्यात आली. सर्वसामान्य जीवनात बांबूवर आधारीत वस्तूंचा जास्तीत जास्त वापर वाढावा व त्यातून युवकांना रोजगार प्राप्त व्हावा या उद्देशाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणात महाराष्ट्राच्या १० विविध जिल्ह्यातील सहभागी १५ युवक-युवतींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या युवक-युवतींनी बांबू दूत म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत राहून बांबूक्षेत्राची प्रचार-प्रसिद्धी करावी, असे मार्गदर्शन केंद्राचे संचालक अशोक खडसे यांनी यावेळी केले. प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या विविध बांबू वस्तूची प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. बेरोजगार युवकांना या प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराचे साधन मिळाल्याचा विश्वास प्रशिक्षणार्थ्यांनी व्यक्त केला.



# रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती रॅलीतून रस्ते सुरक्षा-जीवन रक्षा चा संदेश

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यात १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२४ पर्यंत ३५ वा रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत असून त्या अंतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहे. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, रस्ते अपघातास आळा बसावा, रस्ता सुरक्षेची जाणीव निर्माण व्हावी, निर्भयपणे रस्त्यावर प्रवास करता यावा यासाठी आज (दि.७फेब्रुवारी) रोजी नियोजन भवन येथून शालेय विद्यार्थ्यांची रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून 'रस्ते सुरक्षा-जीवन रक्षा' हा संदेश देण्यात आला.

सदर जनजागृती रॅलीला जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. यावेळी अपर पोलीस अधीक्षक रीना जनबंधू, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, वाहतूक पोलीस निरीक्षक रोशन यादव, प्रवीणकुमार पाटील, प्रादेशिक परिवहन विभागाचे इतर मोटर परिवहन अधिकारी उपस्थित होते.रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती रॅलीमध्ये पोलीस वाहनांवर हेल्मेटची प्रतिकृती व यमराज बसवून हेल्मेटचे जीवनातील महत्व पटवून देत रस्ता सुरक्षेचे महत्त्व स्लोगन व चित्ररथाद्वारे समजावून सांगितले. सदर रॅलीमध्ये भवानजीभाई चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चंद्रपूर, मातोश्री विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रफी अहमद किदवाई हायस्कूल, चांदा पब्लिक स्कूल आणि विद्यानिकेतन हायस्कूल, चंद्रपूर येथील ३०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. सदर रॅली नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय-प्रियदर्शनी चौक- प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयापर्यंत काढण्यात आली.

# जि.प.शालेय क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथून जवळच असलेल्या किटाळी मक्ता येथे आयोजित तीन दिवसीय बीट स्तरीय शालेय बालक्रीडा तथा सांस्कृतिक संमेलनाचे उद्घाटन सोमवारी झाले. या उद्घाटनसमयी विविध शाळेने सादर केलेल्या सांस्कृतिक झांकी ने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.



या बाल क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन सरपंच मनीषा चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. तर अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नलिनी सोनटक्के उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साटगाव ग्रामपंचायतच्या उपसरपंच प्रीती दिडमुठे, व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष गजानन सावसाकडे, पोलीस पाटील चंद्रशेखर गायकवाड, तंटा मुक्त समितीचे अध्यक्ष धनराज चौधरी, डॉ छत्रपती सेंगर, ग्रामपंचायत सदस्य राजू दळवे, स्मिता गेडाम, उपसरपंच वैशाली चौधरी, केंद्र प्रमुख अशोक गायकवाड, दादाजी परचके आदी मान्यवर उपस्थित होते. झांकी कार्यक्रमात हिरापूर व साठगाव केंद्रातील १४ शाळांनी सहभाग घेतला असून सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक इतिहासकालीन झाक्यानी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यात किटाळी मक्ता येथील शाळेने शिक्षणावर आधारित झांकी विशेष आकर्षण ठरले. या झांकी चे परीक्षण संस्कृती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप गारघाटे नेहरू विद्यालयाचे शिक्षक विजय मून सामाजिक कार्यकर्ते आमोद गौरकर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवडशि चे मुख्याध्यापक सुरेश राऊत आंबोली शाळेचे सुखराम खेडेकर व आभार राजकुमार खोब्रागडे यांनी मानले.

# वर्दडीत शिवजयंती निमित्त गौरीताई सांगळे यांचे किर्तन

**सिंदखेडराजा** –छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंतीचे औचित्य साधून दि. १४ फेब्रुवारी रोजी झी टॉकीज फेम शिवचरित्रकार गौरीताई सांगळे यांचे जाहीर किर्तन आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक महेश डोंगरे पाटील राहणार आहेत. छत्रपती प्रतिष्ठान वर्दडी, अशोकराव जाधव तथा उद्योजक रामदास काकडे यांच्या वतिने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी वर्दडी सह परिसरातील शिवप्रेमींनी दि. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८:३० ते१०:३० या वेळेत उपस्थित राहुन किर्तन श्रावणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# नि:शुल्क प्लास्टिक प्रोसेसिंग व ब्लो मौल्डींग मशीन ऑपरेटर प्रशिक्षण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गाकरीता महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, चंद्रपूरद्वारा प्लास्टिक प्रोसेसिंग व ब्लो मोल्डिंग मशीन ऑपरेटर प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण ९ फेब्रुवारी ते २४ मार्च २०२४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येत असून त्याकरीता मुलाखत गुरुवार, दि. ८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता एम.सी.ई.डी.,उद्योग भवन, दुसरा माळा, खोली क्र. २०८, बस स्टॉप समोर, चंद्रपूर येथे पार पडणार आहे.तरी, इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीकरीता एम.सी.ई.डी.,उद्योग भवन, कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहावे. तसेच प्रशिक्षणाच्या अधिक माहितीकरीता ०७१७२-२७४४१६ या कार्यालयीन दूरध्वनी क्रमांकावर अथवा एम.सी.ई.डी.चे प्रकल्प अधिकारी संदीप जाने यांच्या ९६३७५३६०४१ भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी संदीप जाने यांनी कळविले आहे.

# रासेयो शिबिरातून विद्यार्थ्यांना सकारात्मक दिशा मिळते-आ.धोटे




**कोरपना । प्रतिनिधी**

रासेयो शिबिर हे विद्यार्थ्यांचा जीवनाला कलाटणी देणारे असून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार निर्माण करणारे असतात. रासेयो शिबिरातून विद्यार्थ्यांना सकारात्मक दिशा मिळते. असे प्रतिपादन राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे यांनी केले. जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी अंतर्गत येत असलेल्या आसन बूज. येथे गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर द्वारा संचालित महात्मा गांधी कॉलेज ऑफ सायन्सच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष विठ्ठल थीपे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष विकास भोजेकर, सचिव धनंजय गोरे, संचालक रामचंद्र सोनपितरे, प्राचार्य शैलेंद्र देव, उपसरपंच आशिष देरकर, ग्रा. पं. सदस्य लक्ष्मण चिकराम, मुख्याध्यापिका नंदा येसेकर आदी मान्यवर उपस्थित होते. संचालन रासेयो अधिकारी डॉ. संदीप घोडीले यांनी केले तर आभार मनोहर बांदरे यांनी मानले.

# अनेक कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर डोमा जिल्हा परिषद सर्कलचे माना समाजाचे भारतीय जनता पार्टीचे नेते दामोधरजी नंन्नावरे व मारोती जिवतोडे, चरण नंन्नावरे,दुर्योधन नंन्नावरे, प्रशांत नंन्नावरे, अमोल गाडगे, अनिल जिवतोडे, केवलसिंग टांक, सावन जिवतोडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमुर विधानसभा क्षेत्र डॉ.सतिश वारजूकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काँग्रेस पक्षात प्रवेश केला . यावेळी प्रामुख्याने चिमूर विधानसभा क्षेत्राचे युवक काँग्रेसचे अध्यक्ष रोशन ढोक, शंकरपूर ग्रामपंचायतचे सदस्य नितीन सावरकर, शंकरपूर शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष गोकुल सावरकर , कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अमोद गौरकर, ग्रामपंचायत उपसरपंच कवडशी देश बाबा देशमाने, तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

# माता रमाई आंबेडकर जयंती निमित्य फळ वाटप



**मूल । प्रतिनिधी**

माता रमाबाई आंबेडकर जयंती दिनाचे औचित्य साधून महिला राष्ट्रवादी काँग्रेस तर्फ उपजिल्हा रुग्णालय मुल येथे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या मूल शहराध्यक्ष धाराताई मेश्राम(बुरांडे)यांनी मानव सेवा हीच ईश्वर सेवा मानत स्वतः पुढाकार घेत त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीदिनाचे औचित्यसाधत त्यांनी उपजिल्हारुग्णालय मुल येथे रुग्णांना फळ वाटप करून सामाजिक बाधिलकी जपली. योगायोग आज त्यांचाही वाढदिवस होता.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस चे मूल तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार ,शहराध्यक्ष आकाश येसनकर, युवक तालुकाध्यक्ष रोहित कामडे ,महिला तालुकाध्यक्ष संगीता गेडाम,माला शेंडे, रंजना सुखदेवे,रोहित शेंडे,प्रणय रायपुरे,हिरेन दहिलकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .